**पंतप्रधानांचे त्रिनिदाद अँड टोबॅगो स्थित परदेशस्थ भारतीयांना संबोधन (03 जुलै 2025)**

04 जुलै 2025

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्रिनिनाद अँड टोबॅगो स्थित परदेशस्थ भारतीयांच्या समूहाला संबोधित केले. या कार्यक्रमाला त्रिनिदाद अँड टोबॅगोच्या पंतप्रधान महामहिम कमला प्रसाद-बिसेसर, त्यांचे मंत्रिमंडळातील सदस्य, संसद सदस्य आणि अन्य मान्यवर सहभागी झाले होते. पंतप्रधानांचे परदेशस्थ भारतीयांनी अतिशय जिव्हाळ्याने स्वागत केले. रंगीबेरंगी पारंपारिक इंडो-त्रिनिदादियन पद्धतीचे स्वागत लक्षवेधी ठरले.

2. या कार्यक्रमात पंतप्रधान मोदींचे स्वागत करताना, पंतप्रधान कमला प्रसाद बिसेसर त्रिनिदाद अँड टोबॅगोचा सर्वोच्च राष्ट्रीय पुरस्कार "द ऑर्डर ऑफ द रिपब्लिक ऑफ त्रिनिदाद अँड टोबॅगो" प्रदान करण्याची घोषणा केली. पंतप्रधानांनी या सन्मानाबद्दल त्यांचे तसेच त्रिनिदाद अँड टोबॅगोच्या जनतेचे मनापासून आभार मानले.

3. पंतप्रधानांनी आपल्या भाषणात पंतप्रधान कमला प्रसाद-बिसेसर यांचे जिव्हाळापूर्ण संबंध आणि उभय देशांमधील चैतन्यदायी आणि सर्वोत्कृष्ट संबंध मजबूत बळकट करण्यासाठी दिलेल्या योगदानाबद्दल आभार मानले. राष्ट्र भारतीय स्थलांतरितांच्या पहिल्या आगमनाची 180 वी वर्षपूर्ती साजरी करीत असताना त्रिनिनाद अँड टोबॅगो भेटीला ऐतिहासिक पार्श्वभूमी असल्याचे पंतप्रधानांनी यावेळी नमूद केले. पंतप्रधानांनी यावेळी अनिवासी भारतीयांच्या जिद्दीची, सांस्कृतिक समृद्धतेची तसेच त्रिनिदाद अँड टोबॅगोच्या विकासाठीच्या अतुलनीय योगदानाची प्रशंसा केली. त्रिनिदाद अँड टोबॅगो मधील परदेशस्थ भारतीयांचे सांस्कृतिक वारसा तसेच परंपरा जतन करण्याच्या प्रयत्नांबद्दल पंतप्रधानांनी अभिनंदन केले. हे बंध अधिक दृढ करण्यासाठी त्रिनिदाद अँड टोबॅगो स्थित भारतीय वंशाच्या 6 व्या पिढीला OCI कार्ड देण्याची घोषणा पंतप्रधानांनी यावेळी केली. या विशेष उपक्रमाचं टाळ्यांच्या कडकडाटात स्वागत करण्यात आले. गिरमिटिया वारशाचे संवर्धन करण्यासाठी भारत सरकार अनेक उपक्रमांना पाठिंबा देईल, असेही पंतप्रधानांनी अधोरेखित केले.

4.पायाभूत सुविधा, डिजिटल तंत्रज्ञान, उत्पादन, हरित मार्ग, अवकाश, नवोन्मेष आणि स्टार्ट-अप्स ' या क्षेत्रातील भारताच्या जलद विकास आणि परिवर्तनाची रुपरेषा पंतप्रधानांनी सर्वांसमोर मांडली. गेल्या दशकात भारताने समावेशक विकासाला चालना देण्यासाठी महत्त्वपूर्ण प्रगती केली आहे, 250 कोटींहून अधिक नागरिकांना गरिबीतून बाहेर काढल्याची बाब त्यांनी अधोरेखित केली. भारताची विकास गती अधोरेखित करताना भारत लवकरच जगातील तीन प्रमुख अर्थव्यवस्थांमध्ये समाविष्ट असेल असा विश्वास पंतप्रधानांनी व्यक्त केला. कृत्रिम बुद्धिमत्ता, सेमीकंडक्टर आणि क्वांटम कम्प्युटिंग वरील राष्ट्रीय मोहिमा देशाच्या विकासाचं नवीन इंजिन बनत आहेत, यावर पंतप्रधानांनी भर दिला. भारतातील यूपीआय आधारित डिजिटल पेमेंटच्या यश अधोरेखित करताना, त्रिनिदाद अँड टोबॅगो मध्येही त्याचा

अवलंब तितकाच उत्साहवर्धक असेल,असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.  कोविड महामारीच्या काळात भारतानं वसुधैव कुटुंबकम, म्हणजेच जग एक कुटुंब आहे या भारताच्या प्राचीन तत्वज्ञानाचा अवलंब करताना त्यांनी प्रगती आणि राष्ट्रनिर्मितीच्या प्रयत्नात त्रिनिनाद अँड टोबॅगोला सातत्यपूर्ण पाठिंबा देण्याची तयारी दर्शवली.

5. जवळपास 4000  हून अधिक व्यक्तींची उपस्थिती असलेल्या या भव्य कार्यक्रमात महात्मा गांधी सांस्कृतिक सहकार्य संस्थेच्या कलाकारांनी आणि अन्य सहभागी संस्थांनी  मनोरंजक सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

6. पंतप्रधानांचे संपूर्ण भाषण येथे उपलब्ध आहे.

पोर्ट ऑफ स्पेन

03 जुलै 2025